**सुधाकरराव कुलकर्णी स्मृती प्रतिष्ठान तर्फे कोरोनासंदर्भातील जनजागृती उपक्रम – २०२१**

कोविड संदर्भात खूप काही लिहिलं, वाचलं जातं आहे, त्यापेक्षा खूप काही ऐकलं आणि पसरवलं जात आहे. एवढं असूनही, खरी नेमकी माहिती आणि तीही प्रत्यक्ष प्रसंगी वापरता येईल व तिचा नेमका नि थेट लाभ उठवता येईल, अशी खात्रीशीर माहिती लोकांपर्यंत पोचत नाही.

कोरोनाने जग हादरवून सोडलं आहे. भांबावून सोडलं आहे. नेमके याच काळात माध्यमे, माहितीस्रोत प्रचंड वेगाने वाढत गेल्यामुळे जनजागृती होते आहे, त्यासोबतच गोंधळही उडावा, अशी परिस्थिती आहे. हे खरं, कि ते खरं – हे योग्य, कि ते योग्य – इथपासून ते सरकारनं काय करायला हवं किंवा हवं होतं – आणि तसंच डॉक्टरांच्याही बाबतीत, प्रशासनाच्याही बाबतीत, माध्यमांच्याही बाबतीत. शिवाय, या सगळ्या चर्चेचे राजकीय, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक व सांस्कृतिक पडसाद, परिणाम आणि त्यांचे प्रभाव – ह्या सगळ्यांमुळे जनमानस अतिशय विचलित झालेले, गोंधळलेले आहे. एका बाजूला गोंधळ, तर दुसऱ्या बाजूला बेफिकिरी, अनास्था, हतबलता, संसाधनहीनता अशा अनेक नकारात्मक बाबींमुळे सर्वसामान्य नागरीक, ग्रामीण भागातील जनजीवन हेलावून गेलेले आहे. त्यामुळे समज–गैरसमज, अफवा यांचेही साहजिकच पीक आले आहे. ह्या सर्वांत सर्वसामान्यांचे जीवन व जनजीवन म्हणून काही शिल्लक आहे, ते जतन करणे व भविष्यासंबंधी आशावादी वृत्तीने सामाजिक पातळीवर काही मंथन व जनजागरण झाले पाहिजे. या सर्वांवर शेवटी शास्त्रीय व वैज्ञानिक माहिती हाच केवळ उपाय आहे. अन्य मार्गाने होणाऱ्या बुद्धिभेदाला विज्ञान आणि माहितीच छेद देवू शकते. सुशिक्षित, विचारी, सुसंस्कृत समाजाची ती अत्यंत निकडीची तर गरज झालेली आहेच; शिवाय, आजचे दुसऱ्यावरचे संकट कधी आपलेसे होईल, सांगता येत नाही.

**यास्तव, त्याची काहीतरी तजवीज, पूर्वतयारी प्रगत काळात किमान काही जाणीवेने व डोळसपणे व्हावी, यासाठी सर्व समज-गैरसमज, राजकीय व सामाजिक विचारप्रवाह आणि इतर कुठलेही भेदाभेद ओलांडून एक सर्वसामान्य माणूस म्हणून असायला हवी ती माहिती व जाणीव निर्माण करण्याचा एक प्रयत्न सुधाकरराव कुलकर्णी स्मृती प्रतिष्ठान (पानगाव, जि. लातूर) व प्रतिष्ठान अंतर्गत मराठी विज्ञान परिषद, पानगाव विभाग यांच्यातर्फे करण्यात येत आहे.**

कोविडसंदर्भाने अनेक अधिकारी व्यक्तींच्या अभ्यास, अनुभव, व्यासंग, चिंतन व बांधिलकीचा लाभ लोकांपर्यंत पोचवण्यासाठी परिसंवाद मालिकेचे आयोजन करण्यात येत आहे. जनमानसातील अनेक शंका–प्रश्नांचे व्यापक पातळीवर निराकरण व्हावे व भयभीत आणि शंकाकुल झालेले जनमानस डोळस व आत्मविश्वासपूर्ण व्हावे, हा त्यामागचा उद्देश आहे. या परिसंवादासाठी कोविडसंदर्भाने विविध अनुषंगिक क्षेत्रातील – प्राधान्याने वैद्यकीय व संशोधन क्षेत्रातील – मान्यवर तज्ज्ञांच्या व्याख्यान व परिसंवादात्मक उपक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे. तरी, सर्वांनी त्याचा अधिकाधिक संख्येने लाभ घ्यावा, ही विनंती.

या उपक्रमांतर्गत झूम या प्रणालीद्वारे दूरस्थ पद्धतीने तज्ज्ञांच्या व्याख्यानांचे निःशुल्क आयोजन करण्यात येणार असून, फेसबुक लाईव्ह पद्धतीनेही ते प्रसृत करण्यात येणार आहे. दिलेला दुवा वापरून या माहितीपूर्ण कार्यक्रमात सहभागी होता येईल. तरी कृपया, याबाबतीत आपण आपल्या सूचना द्याव्यात. तसेच, आपल्या संपर्कातील सर्व मित्र, नातेवाईक, सेवा व व्यवसायसंबंधित व्यक्ती व परिसरातील नागरीक यांच्यापर्यंत या कार्यक्रमाची माहिती देवून त्यांना या कर्यक्रमात सहभागी होण्याचे आवाहन करावे.

शिक्षक, मुख्याध्यापक, प्राध्यापक / प्राचार्य यांना विनंती आहे की, आपण आपल्या विद्यालयातील, महाविद्यालयातील विद्यार्थी, पालक, संस्थाचालक मंडळ (पदाधिकारी व सदस्य) तसेच ग्रामस्थ, युवक, तरुण, महिला व आबालवृद्ध यांच्यापर्यंत या उपक्रमाची माहिती देवून सहभागी होण्यास प्रवृत्त करावे व या जनजागृती उपक्रमात योगदान द्यावे, ही नम्र विनंती.



# सुधाकरराव कुलकर्णी स्मृती प्रतिष्ठान
## व मराठी विज्ञान परिषद (पानगाव विभाग) तर्फे
## ‘कोरोना जागर’ परिसंवाद मालिका – २०२१
### समन्वयक : डॉ. मुकुंद भिसे, डॉ. संतोष कुलकर्णी

| अ.क्र. | दिनांक / वार | विषय | विषय तज्ज्ञ | विषय समिती |
|---|---|---|---|---|
| १. | १३.०६.’२१ रविवार | कोरोना, संसर्ग व निदानपद्धती | डॉ. बी. एस. नागोबा | डॉ. बी. एस. नागोबा<br>डॉ. मुकुंद भिसे<br>डॉ. प्रिया देशपांडे<br>डॉ. अमित उटीकर<br>डॉ. ऋजुता अयाचित |
| २. | २०.०६.’२१ रविवार | कोरोना - प्रसार व प्रतिबंध | डॉ. मुकुंद भिसे<br>डॉ. प्रिया देशपांडे | |
| ३. | २७.०६.’२१ रविवार | कोविड १९ – विविध अद्ययावत रोगनिदानपद्धती | डॉ. ऋजुता अयाचित<br>डॉ. अतुल देशमुख<br>डॉ. अमित उटीकर | |
| ४. | ०४.०७.’२१ रविवार | कोविड १९ काय आहे ? – १<br>आजार,लक्षणे व उपचारप्रणाली | डॉ. शिरीष पाटील<br>डॉ. सुनिता पाटील<br>डॉ. अरुण मोरे | डॉ. शिरीष पाटील<br>डॉ. सुनिता पाटील<br>डॉ. अरुण मोरे<br>डॉ. ऋजुता अयाचित |
| ५. | ११.०७.’२१ रविवार | कोविड १९ काय आहे ? – २<br>आजार,लक्षणे व उपचारप्रणाली<br>(‘स्पंदन’ या उपक्रमाची माहिती) | डॉ. शिरीष पाटील<br>डॉ. सुनिता पाटील<br>डॉ. अरुण मोरे | |
| ६. | १८.०७.’२१ रविवार | कोविड १९ काय आहे ? – ३<br>प्रतिबंध व लस. | डॉ. प्रिया देशपांडे | |
| ७. | २५.०७.’२१ रविवार | कोविड पश्चात आरोग्य समस्या, निदान व उपचार<br>(‘स्पंदन’ या उपक्रमाची माहिती) | डॉ. शिरीष पाटील<br>डॉ. सुनिता पाटील<br>डॉ. अरुण मोरे<br>डॉ. ऋजुता अयाचित | |
| ८. | ०१.०८.’२१ रविवार | कोविड व मानसिक स्वास्थ्य | डॉ. मिलिंद पोतदार<br>डॉ. दिनेश पाटील<br>डॉ. अनघा राजपूत | डॉ. मृदुला बेळे<br>डॉ. प्रकाश कोयाडे<br>डॉ. मुकुंद भिसे<br>डॉ. संतोष कुलकर्णी |
| ९. | ०८.०८.’२१ रविवार | कोविड – समायोजन, आकडेवारी, संशोधन. जागतिक आरोग्य संस्था व नियमावलीचा जन्म | डॉ. प्रिया देशपांडे<br>डॉ. मृदुला बेळे<br>डॉ. सुनिता पाटील<br>डॉ. मुकुंद भिसे | |
| १०. | १५.०८.’२१ रविवार | कोविड – नंतर ?<br>अनुभवावलोकन व नियोजन<br>... तिसरी लाट ? लहान मुलांच्या संसर्गाची शक्यता (?)<br>(‘स्पंदन’ या उपक्रमाची माहिती) | डॉ. प्रिया देशपांडे<br>डॉ. मृदुला बेळे<br>डॉ. प्रकाश कोयाडे<br>डॉ. अशोक आरदवाड<br>संजय अयाचित | |